Annexure : A

## अधिसूचना

गृह विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- 400 32
दिनांक - 10 जुलै, 2015

क्रमांक : एचडीओ-0215/प्र.क्र.37/आस्था-1 : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, 2015 (सन 2015चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. 5) च्या कलम 3 (1) अन्वये प्राप्त अधिकारानुसार, गृह विभाग, याद्वारे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ गृह विभाग, मंत्रालय (खुद्द) कार्यालयाच्या अधिनस्त कार्यासनांमार्फत तसेच, पोलीस आयुक्त कार्यालये, पोलीस अधीक्षक कार्यालये व त्यांच्या अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयांमार्फत पात्र नागरीकांना पुरवण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपिलीय प्राधिकारी या बाबत खालील परिशिष्ठामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे.

## परिशिष्ठ

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरवण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकाऱ्याचे पदनाम | प्रथम अपिल अधिकाऱ्याचे पदनाम | द्वितीय अपिल अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | तक्रारदारास प्रथम खबरी अहवालाची (एफ.आय.आर) प्रत पुरविणे. | नोंदणीनंतर तात्काळ | पोलीस ठाणे अंमलदार | पोलीस ठाणे अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी /सहाय्यक पोलीस उपायुकत |
| 2 | ध्वनिक्षेपकाचा (लाऊडस्पीकर) परवाना देणे. | कार्यालयीन कामकाजाचे 03 दिवस. | पोलीस ठाणे अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी/ सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय/प्रशासन) | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त (मुख्यालय) |
| 3 | मनोरंजनाचे कार्यक्रमांना ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे 21 दिवस. | कार्यालयीन अधीक्षक/प्रशासकीय अधिकारी | पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय)/सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय/प्रशासन) | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त (मुख्यालय) |
| 4 | सभा, संमेलन, मिरवणूक शोभायात्रा इ. करीता परवानगी देणे. | कार्यालयीन कामकाजाचे 07 दिवस. | पोलीस ठाणे अधिकारी/उपविभागीय पोलीस अधीकारी /पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय | उपविभागीय पोलीस अधिकारी/अतिरिक्त पोलीस अधीक्षक | पोलीस अधीक्षक |
| | | | पोलीस ठाणे अधिकारी/सहा. पोलीस आयुक्त, मुख्यालय | सहा. पोलीस आयुक्त/पोलीस उपायुक्त/पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) | अतिरिक्त पोलीस आयुक्त/पोलीस सह आयुक्त |
| 5 | विदेशी नागरीकांना निवासासाठी मुदतवाढ देणे/ना-हरकत प्रमाणपत्र देणे | कार्यालयीन कामकाजाचे 07 दिवस. | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/पोलीस निरीक्षक, विशेष शाखा. | पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय)/सहायक पोलीस आयुक्त विशेष शाखा | पोलीस अधीक्षक/पोलीस उपआयुक्त, विशेष शाखा. |
| 6 | भारत देशात परत येण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे 07 दिवस. | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/पोलीस निरीक्षक, विशेष शाखा. | पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय)/सहायक पोलीस आयुक्त, विशेष शाखा. | पोलीस अधीक्षक / पोलीस उपआयुक्त, विशेष शाखा. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7 | पारपत्र पडताळणीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे 21 दिवस. | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/पोलीस निरीक्षक, विशेष शाखा | पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय/सहायक पोलीस आयुक्त, विशेष शाखा. | पोलीस अधीक्षक / पोलीस उपआयुक्त, विशेष शाखा. |
| 8 | निमशासकीय, खाजगी संस्था इ. मध्ये नोकरीकरीता वर्तवणूक व चारित्र पडताळणी प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे 30 दिवस. | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/पोलीस निरीक्षक, विशेष शाखा | पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय/सहायक पोलीस आयुक्त, विशेष शाखा. | पोलीस अधीक्षक / पोलीस उपआयुक्त, विशेष शाखा. |
| 9 | पेट्रोलपंप, गॅस एजन्सी, हॉटेल, बार इत्यादी करीता ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे 21 दिवस. | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/पोलीस निरीक्षक, विशेष शाखा | पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय/सहायक पोलीस आयुक्त, विशेष शाखा. | पोलीस अधीक्षक / पोलीस उपआयुक्त, विशेष शाखा. |
| 10 | शस्त्र परवानासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे 21 दिवस. | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/पोलीस निरीक्षक, शस्त्र परवाना. | पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय/सहायक पोलीस आयुक्त, विशेष शाखा. | पोलीस अधीक्षक / पोलीस उपआयुक्त, विशेष शाखा. |